# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

गंगापूररोड, आनंदवल्ली, नाशिक - ४२२ ००५

GANGAPUR ROAD, ANANDVALLI, NASHIK - 422 005

Tel./Fax : 0253-344343 email-muhs@bom6.vsnl.net.in

डॉ. ए. बी. सोलपुरे

एम. डी.

कुलसचिव

फोन : ३४०१७५


दिनांक : ०६/१२/१९९९

क्र. मआविवि/ १०२/३५४७/९९

प्रति,

मा. अध्यक्ष,
संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था,
इस्लामपुर, ता. वाळवा,
जि. सांगली.

**विषय : संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था,इस्लामपुर, ता. वाळवा, जि. सांगली या संस्थेस आष्टा, ता. वाळवा जि. सांगली येथे नव्याने आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देणे बाबत.**

**संदर्भ : शासन निर्णय क्र.एएमसी-१९९९/सीआर -१०१/९९/शिक्षण-२ दि. ०८/१०/९९.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठअधिनियमातील कलम ६५ (४) अन्वये आपल्या प्रस्तावित महाविद्यालयाच्या निरीक्षणासाठी नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या खालील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून आपल्या संस्थेच्या आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली येथे सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून विनाअनुदान तत्वावर आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास व प्रथमतः एक वर्षासाठी संलग्नीकरणास विद्यापीठाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ३०(तीस) राहील.
२) महाविद्यालयाने जाहिरात देवून अध्यापकांची नियुक्ती नियमानुसार करावी व त्यास विद्यापीठाची मान्यता घ्यावी.
३) शवविच्छेदन कक्ष व रुग्णालयाचे काम हमीपत्राप्रमाणे पूर्ण करावे.
४) ग्रंथालयात जास्तीचे ग्रंथ खरेदी करावेत.
५) भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली, शासनाने व विद्यापीठाने आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकाचे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.
६) उपरोक्त २ ते ५ परिच्छेदात दर्शविलेल्या अटींची पूर्तता सहा महिन्याचे आत करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील.

धन्यवाद !

आपला विश्वासु,

PRINCIPAL
Shri Annasaheb Dange Ayurved Medical
llege, Ashta. Tal.Walwa, Dist.Sangli.

(डॉ. ए. बी. सोलपुरे)
कुलसचिव

C:\VR\102-R-2-42

प्रत :

१) सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) सचिव, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद , नवी दिल्ली
३) संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-३२
४) मा. कुलगुरु कार्यालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
५) परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
६) १९९९-२००० प्रवेश प्रक्रिया कक्ष, संबंधीतांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रवेश प्रक्रियेत उपरोक्त महाविद्यालयाचा समावेश करुन ३० प्रवेश क्षमतेपर्यंत प्रवेश करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

PRINCIPAL
Shri Annasaheb Dange Ayurved Medical
llege Ashta. Tal.Walwa, Dist.Sangli.